|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

**Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon**

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

**(Affiliation) संलग्नता विभाग**

जा.क्र.कबचौउमवि/५/संलग्नता/ ३७६ /२०२४ दि.१५/१०/२०२४

**सुधारीत परिपत्रक**

प्रति,

**मा.प्राचार्य / मा.संचालक,**

**सर्व संलग्नीत / स्वायत्त महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था**

**कबचौउमवि, जळगाव**

**विषय :- मा.व्यवस्थापन परिषदेच्या ठरावानुसार जुलै-२०१७ ते आजपावेतोच्या संलग्नता शुल्क व इतर शुल्कांवर १८% जीएसटी, व्याज व दंडासह भरणेबाबत...**

**संदर्भ:-** १) मा.वित्त व लेखा समितीचा ठराव क्र.वि.व ले. स. १५/२०२४-२०२५, दि.२०/०९/२०२४

२) मा.व्यवस्थापन परिषद ठराव क्र.व्य. प. ए-१९८/२०२४, दि.२०/०९/२०२४

**महोदय / महोदया,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, दि.२०/०९/२०२४ रोजी मा.वित्त व लेखा समितीची सभा संपन्न झाली सदर सभेच्या इतिवृत्तास संदर्भीय क्र.२ नुसार व्यवस्थापन परिषदेच्या ठरावान्वये मान्यता देण्यात आलेली आहे.

व्यवस्थापन परिषदेच्या ठरावामध्ये विविध बाबींसह जीएसटी संदर्भात खालील मुद्यांना मंजूरी दिलेली आहे, त्याचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे -

(क) संलग्नता शुल्कासंदर्भात जीएसटी कौन्सीलच्या स्पष्टीकरणानुसार जुलै-२०१७ ते आजपावेतोच्या कालावधीसाठी विद्यापीठाने संलग्नीत महाविद्यालये / संस्था यांचेकडून जे संलग्नता शुल्कांतर्गतचे सर्व प्रकारचे शुल्क आकारले आहे त्याबाबतची सांख्यिकीय माहिती संलग्नता विभागाने त्यांचे स्तरावर कार्यालयीन परिपत्रक निर्गमित करुन प्राप्त करुन घ्यावी. त्यानंतर वित्त विभागाने सदर शुल्कावर १८% जीएसटी, त्यावरील व्याज व दंड अशा रकमेची परिगणना करुन, सदर कालावधीसाठी भरावयाची रक्कम अंतिम करुन ती रक्कम संलग्नता विभागास कळवावी आणि त्यानंतर सदरची रक्कम संबधित संलग्नीत महाविद्यालये / संस्था यांचेकडून संलग्नता विभागाने वसूल करावी, असे सर्वानुमते ठरले.

(ड) यापुढे भविष्यात सर्व संलग्नीत महाविद्यालये / संस्था यांचेकडून संलग्नता शुल्कातंर्गतचे सर्व प्रकारचे शुल्क १८% जीएसटीसह घेण्यात येईल, ही बाब स्पष्टपणे अवगत करण्यासाठी सर्व संलग्नता विभागाने याबाबत एक आगाऊ कार्यालयीन परिपत्रक त्यांचे स्तरावर सर्व संलग्नीत महाविद्यालये तसेच संस्था यांना निर्गमित करावे, असे सर्वानुमते ठरले.

मा.व्यवस्थापन परिषदेच्या ठरावाच्या अनुषंगाने या परिपत्रकाद्वारे आपणांस कळविण्यात येते की, संलग्नता विभागाकडे जुलै-२०१७ पासून ते आजपावेतो जे संलग्नता शुल्क भरलेले आहे त्यावर १८% याप्रमाणे जीएसटी व्याज व दंडासह जमा करणे आवश्यक आहे. तरी सर्व संलग्नीत / स्वायत्त महाविद्यालये / मान्यताप्राप्त परिसंस्था यांनी जुलै-२०१७ पासून ते आजपावेतो जमा केलेल्या संलग्नता शुल्काची सविस्तर माहिती असलेला खालील तक्ता तात्काळ संलग्नता विभागास सादर करावा जेणेकरुन पुढील कार्यवाही करणे सोयीचे होईल.

तसेच यापुढे आकारण्यात येणाऱ्या सर्व प्रकारच्या संलग्नता शुल्कावर १८% जीएसटीसह शुल्क आकारण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी व विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती. त्याचप्रमाणे ज्या महाविद्यालयांनी GST नंबर काढलेला आहे त्यांनी आपल्या महाविद्यालयाचा GST नंबर विद्यापीठास कळवावा.

कळावे,

| अ.क्र. | महाविद्यालयाचे/परिसंस्थेचे नाव | शैक्षणिक वर्ष | संलग्नता शुल्क जमा रक्कम | पावती क्रमांक व दिनांक | संलग्नतेचा प्रकार | महाविद्यालयाचा GST नंबर असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

आपला विश्वासू,

15-10-2024

**उपकुलसचिवां करीता**

**प्रत माहितीस्तव :-**

०१) मा.कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

०२) मा.प्र-कुलगुरु कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

०३) मा.कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि, जळगाव

०४) मा.वित्त व लेखा अधिकारी, कबचौउमवि, जळगाव